

# बोलकी जीवसृष्टी

बोलणे ही क्रिया पृथ्वीवरील बऱ्याच प्राण्यांमध्ये आढळते. प्राणी बोलतात म्हणजे एक प्रकारचा ध्वनि निर्माण करतात; जसे कुत्र्याचे–भुंकणे, गायीचे–हंबरणे, वाघाची–डरकाळी, सापाचे–फुत्कारणे, हत्तीचे–चित्कारणे, बेडकाचे–डराँव डराँव, माणसांचा–गोंगाट, तर पक्ष्यांचा–किलबिलाट.

निसर्गात पक्षी निरनिराळे आवाज काढतात आणि त्यांची एक वेगळीच आवाज की दुनिया आहे. पक्षांमधील आवाज हे दोन प्रकारचे असतात. पहिला प्रकार कंठजन्य म्हणजे कंठातून वा गळ्यातून स्वरयंत्रामुळे निघालेला आवाज, तर दुसरा प्रकार अकंठजन्य म्हणजे कंठ किंवा स्वरयंत्राशिवाय अन्य शरीर भागांच्या सहाय्याने काढलेला आवाज. कोकीळ पक्षाचा कुहूकुहू आवाज कंठजन्य आहे, तर सुतारपक्षाने चोचीच्या सहाय्याने टक्टक् काढलेला आवाज हा अकंठजन्य आहे. गाण्याची कला मानवाप्रमाणे पक्ष्यांमध्येही आढळते. पक्षी आपल्या गाण्याने मानवाला मोहित करतात; आनंद व मानसिक सुख देतात. बहुतांश नरपक्षी गातात, पण काही मादी पक्षीही गातात. पहाटे ऐकू येणारा पक्ष्यांचा किलबिलाट आपले मन उल्हासित करतो. तर कोकीळ स्वरांनी वसंत ऋतुचे आगमन झाल्याचे भान सर्वांनाच होते.

पक्षी गानाची किंवा कूजनाची अनेक कारणे आहेत, जसे–

१) काही पक्षी प्रादेशिक अधिकार गाजविण्यासाठी किंवा सजातीय पक्षी नरांना आपल्या क्षेत्रात न येण्याबद्दल धमकाविण्यासाठी गातात.

२) आपल्या जातीच्या सहचारिणीस किंवा सहचारास आकर्षित करण्यासाठी पक्षी गातात. आपल्या सहकाऱ्याच्या कामवासना जागृत करुन त्यासाठी त्याला उद्दिपीत करण्यासाठी पक्षी कूजन हे महत्वाचे कारण होय. कोंबड्याने पहाटे दिलेली बांग ही आपल्याला उठविण्यासाठी नसून त्याने आपल्या मादीला दिलेला तो इशारा असतो किंवा दिवसाचे टायटल साँगच असते.

३) वैयक्तिक ओळख पटविण्यासाठी आणि जोडीने

राहण्यासाठी पक्षी गातात.

४) काही मादी पक्षी अत्यंत मृदू स्वरात कूजन करतात. जणू काही त्या घरट्यातील आपल्या पिलांसाठी ते अंगाई गीतच गात असतात.

५) पण ज्या नरपक्ष्यांना मादी पक्षी सहचारिणी म्हणून मिळत नाही, ते नरपक्षी मात्र कर्कश आवाजात गातात आणि जणू काही यंदा कर्तव्य आहे हेच सुचवितात.

६) काही घुबडांच्या जातीत उड्डाण करताना किंवा संचारणासाठी द्वंद्वगीत तसेच समुहगानही आढळते.

७) काही पक्ष्यांच्यात मादी पक्षी आपल्या घरट्याचे शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी गाण्याचा उपयोग करतात. यामध्ये शत्रूपक्षाला घाबरवले जाते किंवा नरपक्षास सहाय्यासाठी बोलाविले जाते अशावेळी गाणी गाऊन आकांत केला जातो.

८) कबूतर पक्षात गुटर्रगु आवाजाने एकमेकांना साद घातली जाते आणि भावनांना वाट करुन दिली जाते.

९) काही पक्षांत कामाची सूचना देण्यासाठी गाण्याचा उपयोग केला जातो.

१०) काही पक्षी भांडताना एकमेकांना आव्हान देण्यासाठी गातात.

११) पक्षी वर्गातील काही पक्षी एकमेकांच्या नक्कला करु शकतात. तसेच मानवी आवाजाच्या नक्कलाही हे पक्षी करु शकतात. लहानबाळ ज्या घरात वाढले त्या घरातील भाषा शिकते. त्याप्रमाणे काही पाळीवपक्षी मानवी भाषा शिकतात. पोपटाची पिंजऱ्यातील पोपटपंची आपल्या सर्वांच्या परिचयाची आहे.

१२) चक्रवाक नरपक्षी चक्रवाकी मादी पक्ष्याच्या विरहामुळे गातात. याचा संस्कृत वाङ्मयात उल्लेख आढळतो.

१३) काही पक्षी पीडा, क्लेश, आपत्ती आणि भय सुचविण्यासाठी गातात.

१४) काही पक्षी संकटसमयी एकत्र जमण्यासाठी गाऊन आदेश देतात.

१५) नाचरे पक्षी विविधता असलेली गाणी गाऊन मादीस आकर्षित करतात. मुरारीपक्षी जलतरंगाच्या नाजूक आवाजात गातो आणि हवेतल्या हवेत संगीत नृत्यही करतो.



१६) शहामृग हा न उडणारा पक्षी लांब गळ्याच्या सहाय्याने गुरगुरतो आणि शत्रुपासून आपले संरक्षण करतो.

१७) कोकीळ, बुलबुल असे पक्षी आनंद व्यक्त करण्यासाठी गातात.

कोकीळ हा पक्षीवर्गातील सर्वोत्कृष्ट गाणारा पक्षी म्हणून ओळखला जातो. यावरुनच सुप्रसिद्ध गायिका गानसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर यांना गान कोकीळा ही पदवी लाभली.

पक्षीगान म्हणजे अधिक सूचक, अधिक काळ चालणारा, पुनरावृत्तीचा, मिश्र, जटील पण कानाला गोड वाटणारा प्रकार आहे. जवळजवळ ५० जातींचे पक्षी गातात. पक्षीगान बरेच जटील आहे. सर्वप्रथम १९०८ साली लंडन येथे एच. एम. व्ही. कंपनीने पहिली पक्षीगानाची ध्वनिफीत तयार केली. १९६२ पर्यंत सुमारे २३०० पक्षांचे आवाज ध्वनिमुद्रित केले गेले. अशा या पक्षीगानाचे संगणकासारख्या अत्याधुनिक उपकरणाच्या सहाय्याने विश्लेषण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पक्षीगानाचे शास्त्रीय विवेचन जटील असले तरी सामान्यतः पक्षीगान हे कानाला सुमधुर वाटते आणि मोहून टाकणारे असते यात शंका नाही.

**मोहन पुजारी**
मोबा. 9422333430